# उपविधी

# बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्या पुणे जि.पुणे

# उपविधी

(**सूचना**- या उपविधीत केलेला अधिनियमांचा व नियमांचा उल्लेख हा अनुक्रम महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व त्या अन्वये केलेले नियम, १९६१ यांचा आहे असे समजावे.)

**प्रकरण एक : प्रारंभिक**

( सर्वसाधारण सहकारी संस्था )

१. **संस्थेचे नाव** :- बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्या. पुणे

२. **संस्थेचा नोंदविलेला पत्ता** :- बोधिसत्व सहकारी रुग्णालय पुणे, पुणे इंटरनॅशनल स्कूल लेन नंबर १४, आदर्श नगर, विद्यानगर, पुणे ४११०३२ असा राहील.

३. **संस्थेचे वर्गीकरण** :-

१) संस्थेचे वर्गीकरण सर्वसाधारण संस्था व उपवर्गीकरण " **इतर संस्था** " असे राहील.

४. **संस्थेचे कार्यक्षेत्र** :- संपूर्ण पुणे जिल्हा भौगोलिक सीमेपुरते मर्यादित राहील.

५. **संस्थेचे उद्देश पुढील प्रमाणे :-**

१) वैदयकीय शिक्षण संस्था व संशोधन केंद्रे चालविणे. उदा. एम.बी.बीएस, डेन्टल, फिजिओथेरपी, नर्सिंग, आयुर्वेद, होमीओपॅथी महाविदयालय काढणे, व चालू करणे, तसेच रेडिओ डायग्नोस्टीक सेंटर, कन्सलटींग क्लिनीक, डीसपेन्सरी, मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, पॅथालॉजी लॅब, मॅटर्निटी होम्स, प्राथमिक आरोग्य सुविधा केंद्र, डायबेटीक, हृदयरोग, कॅन्सर, इएनटी हॉस्पिटल उभारणे, मेडिकल टुरिझम.

२) रूग्णालय स्थापने, त्याची व्यवस्था पाहणे, ते चालविणे, त्याचे प्रशासन करणे व सुव्यवस्थित राखणे.

३) संस्थेची महाविदयालये व रुग्णालये याकरीता स्थावर व जंगम मालमत्ता शासकीय, नीमशासकीय संस्था व खाजगी व्यक्तीकडून संपादन करणे, खरेदी करणे, दीर्घ मुदतीच्या खंडाने, भाडयाने घेणे, दान देणग्या स्वरूपात घेणे, हक्क वहीवाटी मिळविणे, बांधकाम करणे, वैदयकीय उपकरणे, यंत्रसामुग्री, सयंत्रे, साधन व साहित्य, अवजारे, औषधी व रूग्णोपयोगी माल खरेदी करणे, देणगी स्वरूपात स्विकारणे/घेणे.

अध्यक्ष

बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्या. पुणे

४) नागरीकांना रूग्णालयाद्वारे सेवा उपलब्ध करून देणे

५) देणग्या, अनुदान, भेट वस्तू, रोख व वस्तु स्वरूपात स्विकारणे

६) संस्थेच्या संपूर्ण अगर अंशतः मालमत्ता विकणे, खंडाने देणे, गहाण टाकणे, अगर इतर रितीने विल्हेवाट लावणे.

७) संस्थेच्या मालमत्तेत अगर हक्क व हितसंबंधात वेळोवेळी सुधारणा करणे, विकास करणे.

८) संस्थेचा सेवक भविष्य निर्वाहनिधी स्थापना करणे, चालू ठेवणे, राखणे,

९) रूग्णालयाने, वैदयकीय महाविदयालये संशोधन करणे, प्रयोगशाळा स्थापन करणे, प्रायोगिक कर्मशाळा काढणे, चालविणे, परिक्षण करणे, प्रशिक्षण केंद्र चालविणे.

१०) वरील उद्देशाचे पुर्ततेसाठी राज्य, केंद्र सरकारकडून तसेच स्थानिक स्वराज्य संस्थाकडून विशेषाधिकार, सवलती, परवाने, अधिकार पत्रे, अर्थसहाय्य मिळविणे अगर महाविदयालये रूग्णालयाच तसेच रूग्णालयाचे हितसंबंधाचा प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष प्रगतीकारक आहेत असे वाटणा-या कोणत्याही कारणांसाठी मंजूरी मिळविणे, सक्षम प्राधिका-याकडे अर्ज करणे.

११) कार्यपालन नियम तयार करणे.

१२) सभासदांचे काटकसर, परस्पर सहकार्य व स्वावलंबन यांना उत्तेजन देणे.

१३) औषधी दुकान चालविणे,

१४) संस्थेच्या सदस्यांच्या गरजा भागविण्याकरीता उपविधी क्रमाक ६ मध्ये नमूद केलेलय साधनांनी भांडवल जमा करणे.

१५) सदस्यांच्या व इतर नागरीकांकरीता सामाजिक सुरक्षिततेच्या योजनांची अंमलबजावणी करणे, यात विमा, अपघती विमा काढणे व आरोग्य विमा कंपन्या बरोबर टायअप करणे.

अध्यक्ष

बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्या. पुणे

१६) सदस्यांची नैतिक, सामाजिक व आर्थिक उन्नती करणे.

१७) संस्थेच्या कामकाजासाठी डॉक्टर, नर्सेस, तज्ञ अधिकारी, कामगार व प्रशासकीय सेवक, Skilled workforce नेमणे, त्यांचे नियंत्रण करणे व जरूरीनुसार त्यांना कमी करणे.

१८) संस्थेच्या सभासदांना, संचालकांना तसेच कर्मचा-यांना सहकार विषयक प्रशिक्षण देणे व त्यासाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद करणे.

१९) संस्था सदस्यांच्या आर्थिक सामाजिक व सर्वसाधारण प्रगतीसाठी कार्य करणे व वैदयकीय सुखसोयी सेवा सुविधा पुरविणे.

२०) सहकारी तत्त्वे मुल्ये व कार्यप्रणाली नुसार सहकारी संस्था चालविणे.

२१) संस्थेचे सभासद व कुटुंबातील सदस्यांना रूग्णालयाद्वारे वैदयकीय सुविधा सवलतीच्या दराने पुरविणे तथापि, अशा सवलतीच्या सुविधा संस्थेचे संचालक मंडळ सदस्य व कुटुंबातील सदस्यांना अनुज्ञेय राहणार नाही.

२२) दारिद्रयरेषेखालील कुटुंबास सवलतीच्या दराने अथवा निशुल्क वैदयकीय सुविधा पुरविणे.

**६. निधी :-**

१.) सभासद अर्ज विक्री व प्रवेश फी

२.) सभासद, नाममात्र सभासद यांचेकडून वार्षिक वर्गणी रूपाने व सभासदांकडून भागभांडवल रूपाने

३.) वित्तीय संस्था / महामंडळे / शासनाकडून कर्ज रूपाने

४.) सभासद, नाममात्र सभासद यांचेकडून दान / देणगी रूपाने

५.) शासकीय अनुदान, व्यक्ती, कंपनी, भागीदारी संस्था, सहकारी संस्थाकडून देणगी / दान व भागभांडवल रूपाने

६.) सभासद / नाममात्र सभासदांकडून बिनव्याजी ठेवी.

(७.) सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून गोळा होणारा निधी.

८.) नाममात्र सभासदांकडून रू १०००/- प्रवेश फी रूपाने.

टीप १ :- भागाची विक्री करणे व विक्री केव्हाही थांबविणे हे संचालक समिती ठरवेल.

टीप २ :- निधीशी संबंधित महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ चे तरतूदी लागू राहतील.

अध्यक्ष

बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्या. पुणे

## प्रकरण (२) सभासदत्व

**७.** संस्थेचे सभासदत्व मिळणेसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २२(१) पमाणे पात्रता असणा-यांना सभासद होता येईल. सर्वसाधारणपणे खालील अटींची पूर्तता करणे अनिवार्य राहील.

१. ती व्यक्ती पूर्ण १८ वर्ष वयाची व करार करण्यासाठी भारतीय करार कायदा १८७२ अन्वये लायक असली पाहीजे.

२. तो चांगल्या वर्तणूकीचा असला पाहीजे.

३. त्याची पत चांगली असली पाहीजे. नादार नसावा.

४. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील विहीत नमुन्यात त्याने सभासदत्वाकरीता अर्ज दिला असला पाहीजे.

५. संस्थेचे उद्देश त्यास समजले असले पाहीजेत.

६. त्याचा सभासद होण्याबद्दलचा लेखी अर्ज संचालक मंडळातील हजर असणा-या एकूण संचालकाच्या बहुमताने मंजूर केलेला असला पाहीजे.

७. त्यांनी रु. १०००/- प्रवेश फी दिली असली पाहीजे.

८. त्यानी किमान एक तरी भाग घेऊन त्याची पूर्ण रक्कम भरली असली पाहीजे.

९. अधिनियम, नियम, उपविधी यातील अटी त्याने पूर्ण केलेल्या असल्या पाहीजेत.

१०. उद्देशात नमूद बाबीशी संबंध व्यक्त करणारा असला पाहीजे. त्यासाठी संस्थेच्या उद्देशाप्रमाणे आर्थिक संबंध व्यवहाराच्या रूपाने असला पाहीजे.

११. सारखेच उद्देश असलेल्या दुस-या सहकारी संस्थेचा तो सभासद नसला पाहीजे.

१२. संस्थेचे नाममात्र सभासदत्व मिळणेसाठी लेखी अर्ज केला पाहीजे व त्यासोबत प्रवेश फी रू १०००/- दिली पाहीजे.

**७ अ) क्रियाशील सभासद :-** म्हणजे ज्या सभसदाने मागील सलग ५ वर्षात किमान एक अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीस उपस्थिती आणि प्रत्येक वर्षी वार्षिक वर्गणी रू २०००/- देणे अनिवार्य राहील. याव्यतरिक्त प्रथम पाच वर्षात किमान रू ५०,०००/- बिन व्याजी ठेवी किंवा रु २००००/- देणगी किंवा मागील सलग पाच वर्षात रूग्णालय सेवेचा लाभ घेतला असला पाहीजे.

अध्यक्ष

बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्या. पुणे

**७ ब )अक्रियाशील सभासद :-** जो सभासद वरील ७'अ' मधील तरतूदीची पूर्तता करीत नसेल अशा सभासदांचे वर्गीकरण अक्रियाशील सभासद म्हणून करण्यात येईल.

**टीप :-** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २६ मधील तरतूदींचे पालन करणे अनिवार्य राहील.

## प्रकरण (३) भागभांडवल

८. प्रत्येक भागाची दर्शनी किंमत रू ५०००/- राहील. एकूण भागभांडवलाची कमाल मर्यादा ५,००,००,०००/- राहील. तसेच एकूण भागाची संख्या १०,००० राहील.

९.संस्थेच्या एकूण वसूल भागाच्या १/५ रकमेपेक्षा अधिक किंवा रुपये पाच लाख रुपये पेक्षा जास्त रकमेचे भाग धारण करता येणार नाही. फर्म, कंपनी, धर्मादाय संस्थांना रुपये एक लाखापर्यंत भाग धारण करता येईल.

**१०. रु २०,०००/- पेक्षा जादा भाग धारण करण्याकरीता अर्ज लेखी केला पाहीजे व संचालक मंडळाकडून अशा अर्जाचा निर्णय केला जाईल. - वगळण्यात आले आहे.**

**११.** प्रत्येक सभासदाने वार्षिक वर्गणी रु २०००/- दिली पाहीजे. सदर रक्कम थकीत झाल्यास अक्रियाशील ठरविले जाईल.

टीप - अशा रितीने जमा झालेल्या वर्गणीची रक्कम प्रत्येक सभासदांच्या नावे १०० भागांच्या रकमेपर्यंत भागापोटी जमा केली जाईल व त्यापुढे जमा होणारी रक्कम संचित ठेव ( Cumulative Deposit) ठेव म्हणून जमा राहील अशा प्रकारे ठेव रूपाने जमा होणा-या रकमेवर व्याज अनुज्ञेय नाही.

**१२.** सभासदाने घेतलेल्या भागाचा त्यास संस्थेने भाग दाखला दिला पाहीजे.

अध्यक्ष

बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्या. पुणे

बोधिसत्व

**१३.** भागांचे हस्तांतरण अधिनियम कलम २९ व ३० व नियमामधील तरतूदीनुसार केले जाईल. संचालक मंडळाच्या मंजुरीने दुस-या सभासदास अगर ज्याच्या सभासदत्त्वाचा अर्ज संचालक मंडळाने मंजूर केला असेल अशा व्यक्तीच्या नावे तो भाग हस्तांतरीत करता येईल. प्रत्येक भाग हस्तांतरीत करण्याकरीता रू ५०० फी आकारली जाईल. ज्याचे नावे भाग हस्तांतरीत केला त्याचे नाव भागांच्या हस्तांतरण नोंदवहीत दाखल केल्याखेरीज हस्तांतरीत करणा-याने आपली संस्थेची देणी भागविल्या खेरीज भागांचे हस्तांतरण पूर्ण होणार नाही.

**१४.** कोणाही सभासदास नामनिर्देशन, नियमास अनुसरून करता येईल. संस्थेने अशा प्रकारे नामनिर्देशन विहीत पध्दतीने संस्थेच्या दप्तरी नोंदले पाहीजेत. सभासदाने नामनिर्देशन करताना अर्जासोबत रू २५०/- इतकी फी भरली पाहीजे.

**१५.** एखादया सभासदाच्या मृत्युनंतर त्याचे भाग अगर हितसंबंध त्याने नेमलेल्या वारसदारांच्या नावे वर्ग केली जातील असा वारसदार नेमला नसेल तर त्याचे भाग अगर हितसंबंध अधिनियम कलम ३० व नियम २५ मधील तरतूदीनुसार त्याच्या वारसाच्या अगर कायदेशीर प्रतिनिधीच्या नावे हस्तांतरीत केले जातील, मात्र हस्तांतरण करण्यापूर्वी त्या नेमलेल्या वारसास अगर कायदेशीर प्रतिनिधीस संस्थेचे सभासद करून घेतले जाईल. त्याकरीता संस्थेने ठरविलेल्या नमुन्यात त्याने अर्ज केला पाहीजे. सभासदाकरीता त्याला पुन्हा भाग विकत घेण्याची जरूरी नाही.

**१६.** एखादया सभासदाच्या मृत्युनंतर त्याच्या खात्यात असलेल्या भागांचा किंवा हितसंबंधाच्या रकमेतून संस्थेस त्याच्याकडून जे येणे असेल ते वजा करून उरलेली रक्कम त्याने नेमून दिलेला वारसदार अथवा वारसदार नेमला नसेल तर संचालक मंडळाच्या मते मयताचा जो कोणी योग्य वारस अगर कायदेशीर प्रतिनिधी असेल त्याच्याकडून योग्य त्या प्रमाणात नुकसान भरपाई रोखा ( A bond of Indemnity) लिहून त्याने मागणी केल्यापासून ६ महिन्याच्या आत अधिनियमा २९ (३) व नियम २१ मधील तरतूदीप्रमाणे दिल्ली जाईल.

**१७.** सभासदत्तवातून कमी झालेल्या व्यक्तीस तो कमी झाल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत त्याच्या भागांची रक्कम त्याला दिली जाईल मात्र त्याच्याकडून येणे असलेल्या रकमा त्या भागांच्या रकमातून कापून घेतले जातील. तसेच कोणत्याही वर्षात परत करावयाचे भागभांडवल हे त्यापूर्वीच्या ३१ मार्च रोजी असलेल्या संस्थेच्या एकूण भागभांडवलाच्या १० टक्केपेक्षा जास्त असणार नाही.

**१८.** संस्थेने जर शासकीय अगर वित्त पुरविणा-या बँकेचे कर्ज घेतले असेल तर संबंधित निबंधक अगर अशी बँक यांच्या पूर्व संमतीशिवाय संस्थेस कोणत्याही भागांची रक्कम परत करता येणार नाही.

अध्यक्ष

बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्या. पुणे

(टीप:- उपविधी क्र. १५ व १६ च्या कारणासाठी भागांची रक्कम परत करताना भागांची किंमत महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६३ मधील तरतूदीनुसार केली जाईल व भागाची रक्कम देताना तीच विचारात घेतली जाईल)

## प्रकरण ४ अधिमंडळाची वार्षिक बैठक

**१९.** संस्थेच्या अधिमंडळाची वार्षिक बैठक संस्थेची सर्वोच्च सत्ता राहील, पण ती सत्ता अधिनियम, नियम, उपविधी यातील तरतुदीना अधिन राहून असेल.

**२०.**संस्थेची पहिली अधिमंडळाची वार्षिक बैठक अधनियम व नियमामधील तरतुदीनुसार भरविली जाईल. व त्या सभेत अनुषंगिक कामे केली जातील.

**२१.**दरवर्षी आर्थिक वर्ष संपल्यानंतर ३० सप्टेंबर पूर्वी अधिनियमातील कलम ७५ मधील तरतूदीनूसार विहीतपध्दतीने अधिमंडळाची वार्षिक बैठक बोलविली जाईल.

**२२.**अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीत अधिनिमातील तरतूदीनूसार विषय सूची राहील. व सदर सभा बोलावण्याची जबाबदारी अध्यक्षाची राहील.

**२३.**अधिनियमातील कलम ७६ मधील तरतूदीनूसार संस्थेला अधिमंडळाची विशेष बैठक बोलविता येईल.

**२४.**अधिमंडळाची वार्षीक बैठकीची कार्यपध्दती कलम ७५ व नियम ६० मधील तरतूदीनूसार राहील.

**२५.**अधिमंडळाची वार्षिक बैठकीची १४ दिवसांची व विशेष बैठकीची ७ दिवसांची लेखी नोटीस व कार्यक्रम पत्रिका सभेपूर्वी काढून संस्थेच्या अध्यक्षाने ती सभा बोलविली जाईल. अशा सभेची सूचना निबंधकांना दिली जाईल. सभेची नोटीस व कार्यक्रम पत्रिका संस्थेच्या नोटीस बोर्डवर लावून प्रसिध्द केली जाईल. नोटीसीत सभेची तारीख व निश्चित वेळ नमूद केली पाहिजे. संस्थेच्या अध्यक्षांच्या गैरहजेरीत उपाध्यक्ष हे नोटीसीवर सह्या करतील.

**२६.**अधिमंडळाच्या बैठकीत किमान २५ सभासद हजर असले म्हणजे गणपूर्ती पूर्ण झाला असे समजले जाईल. या बैठकीत गणपूर्ती झाली नसेल तर ती बैठक अर्धातास तहकूब करण्यात येईल व अर्ध्यातासानंतर अशा बैठकीस गणपूर्ती असो वा नसो बैठकीचे कामकाज पूर्ण केले जाईल.

अध्यक्ष

बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्या. पुणे

**२७.**संस्थेचे अध्यक्ष हे वार्षिक अधिमंडळाच्या बैठकीचे अध्यक्ष राहतील. त्यांच्या गैरहजेरीत उपाध्यक्ष अध्यक्ष स्थान स्विकारतील. अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे उनुपस्थितीत अधिमंडळ बैठक अध्यक्षांची निवड करतील.

**२८.** वार्षिक अधिमंडाळाच्या बैठकीत हजर असणाऱ्या प्रत्येक सभासदाला एकच मत देण्याचा अधिकार राहील. परंतू अधिनियमातील कलम ७३ कअ नूसार सदर सभासद अनहर्तता धारत करत असलेस तो मत देण्यास पात्र राहणार नाही. मत विभागणी नंतर सारखेच मतदान ठरावाच्या बाजूने व विरुध्द पडल्यास अध्यक्षास एक जादा निर्णायक मत देण्याचा अधिकार राहील.

**२९.**अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीत पारित झालेल्या ठरावात बदल करण्यासंबंधीचा ठराव अधिमंडळाच्या बैठकीत पारित झालेल्या मुळ ठरावाच्या दिनांकापासून ६ महिन्याच्या आत पुढील अधिमंडळाच्या बैठकीत आणता येणार नाही.

## प्रकरण ५ संचालक मंडळ

**३०.(अ)** संस्थेच्या संचालक मंडळामार्फत संस्थेच्या कामकाजाची व्यवस्था पाहिली पाहीजे, संचालक मंडळात निवडून येणारे एकूण १५ संचालक असतील. संचालक मंडळाचा कालावधी निवडणूक दिनांकापासून पुढे ५ वर्षे इतका राहील. तसेच संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचा कालावधी संस्थेच्या संचालक मंडळाच्या कालावधी इतका राहील. निवडून आलेल्या संचालक मंडळाची रचना पुढील प्रमाणे :-

१. अनुसूचित जाती सभासद प्रतिनिधी ....................................११
२. इतर मागासवर्गीय सभासद प्रतिनिधी...................................१
३. महिला सभासद प्रतिनिधी ....................................................२
४. वि .ज. भ. ज./विमाप्र सभासद प्रतिनिधी...............................१
एकूण.....................................................................................१५

वरील १५ प्रतिनिधी पैकी ५ प्रतिनिधी वैदयकीय व्यवसायिक असणे अनिवार्य राहील. वरील संचालक पदे संस्थेच्या सभासदामधून निवडणूकीव्दारे भरली जातील व सदर निवडणूक ही राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामार्फत घेण्यात येईल.

अध्यक्ष

बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्या. पुणे

**३०.(ब)**- ३०.(अ) शिवाय संस्थेचे वैद्यकीय संचालक हे कार्यलक्षी संचालक म्हणून संचालक मंडळावर कार्यरत राहतील. तसेच आयुक्त सामाजिक न्याय अथवा त्यांचे प्रतिनिधी व संस्थेचे निबंधक हे पदसिध्द संचालक असतील. तसेच संस्थेच्या देणगीदारांकडून एक प्रतिनिधी स्विकृत करण्याचा संचालक मंडळास अधिकार असेल. ३०.(अ) मध्ये नमुद असलेल्या एकूण संचालक संख्ये पेक्षा ३०. (ब) मध्ये नमूद केलेली संचालक संख्या अतिरिक्त असेल. तथापि ३०. (ब) मधील संचालकांना मतदानाचा अधिकार असणार नाही. अथवा त्यांना पदाधिकारी होता येणार नाही.

**३१.** संस्थेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष हे अनुसूचित जाती प्रवर्गातीलच असतील.

**३२.**संचालक मंडळातील रिक्त होणाऱ्या जागा अधिनिमातील तरतूदीप्रमाणे भरता येतील.

**३३.**योग्य कारण दाखविल्याशिवाय संचालक मंडळाच्या लागोपाठ ३ सभांना गैरहजर राहिल्यास संचालक पदावर राहण्यास अपात्र ठरेल. अशा सदस्याचे नाव संस्थेच्या निबंधकाकडे कळविणे अनिवार्य राहील.

**३४.**संचालक मंडळाची गणपती होण्यास पोटनियम क्र. ३०.(अ) मध्ये नमुद संचालक संदस्यापैकी ८ सभासद उपस्थित असल्यास गणपूर्ती झाली असे समजण्यात येईल. ३०.(ब) मधील संचालक गणपूर्तीसाठी गणले जाणार नाही.

**३५.**अधिनियमातील तरतूदीनुसार पदाधिकाऱ्या विरूध्द अविश्वास ठराव आणता येईल.

**३६.**जर एखादा सभासद अधिनियम, नियम व उपविधीतील तरतुदीनुसार अपात्र ठरला असल्यास तो संचालक म्हणून निवडून येण्यास, स्विकृत करण्यास किंवा संचालक म्हणून चालू राहण्यास अपात्र ठरेल.

**३७** संचालक मंडळ सभेची नोटीस कमीत कमी पूर्ण ७ दिवसांची असली पाहिजे.

**३८.**सदरची नोटीस सर्व संचालकांना पाठविली पाहिजे, संचालक मंडळ सभेची विषय सूची संस्थेच्या अध्यक्षाच्या सूचनेनूसार ठरवून संचालक मंडळाची सभा बोलविली गेली पाहिजे.

अध्यक्ष

बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्या. पुणे

३९.संचालक मंडळ सभेचे अध्यक्ष हे संस्थेचे अध्यक्ष राहतील. त्याचे गैरहजेरीत संस्थेचे उपाध्यक्ष सदर सभेचे अध्यक्ष स्थान स्विकारतील. समान मत प्रसंगी सभेच्या अध्यक्षाला एक जादा मत देण्याचा अधिकार राहील. मात्र सदर निर्णायक मताचा हक्क पदाधिकारी निवडीचे प्रसंगी राहणार नाही.

४०. संस्थेच्या संचालक मंडळाच्या आवश्यक तितक्या सभा बोलाविल्या पाहिजे. निदान 2 महिन्यातून 1 तरी सभा घेतली पाहिजे.

**४१. संचालक मंडळाची कामे पुढील प्रमाणे असतील.**

१. सभासद होण्यासाठी व भागासाठी आलेल्या अर्जावर निर्णय घेणे.
२. कर्ज काढणे, ठेवी स्विकारणे, देणगी स्विकारणे.
३. भागांच्या व इतर येणे रक्कमांची वसूली करणे.
४. संस्थेच्या सुयोग्य व्यवस्थापणासाठी आवश्यकतेप्रमाणे उपसमित्या गठीत करणे.
५. उद्देशामध्ये नमूद असलेली सर्व कार्य हाती घेणे तसेच संस्था व सभासदांच्या हितासाठी आवश्यक करार करणे.
६. संस्थेचे खर्च मंजूर करणे.
७. संस्थेचे वार्षिक अहवाल, हिशोब पत्रके, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, तेरीज पत्रक तयार करणे, मान्यता देणे, व शिफारशीसह अधिमंडळ बैठकीस सादर करणे.
८. संस्थेची अधिमंडळाची वार्षिक बैठक अधिनियमातील तरतूदीनूसार बोलावणे.
९. वैद्यकीय संचालक व इतर अधिकारी व सेवक यांच्या नेमणूका करणे, तथापी संस्थेतील ७० टक्के सेवक वर्ग अनुसूचित जाती प्रवर्गातीलच नेमणूक करणे. सेवा शर्ती च्या अटी ठरविणे, पगार व भत्ते ठरविणे, शिस्तभंगात्मक कारवाई करणे, बडतर्फ करणे, रोखे घेणे, व सर्वसाधारण देखरेख व नियंत्रण ठेवणे.
१०. संस्थेच्या आणि संभासदांच्या गरजा /अजमावून कामासाठी लागणारी उपकरणे, साधने व इत्यादी खरेदी करण्याची तजवीज करणे.
११. संस्था वापरीत असलेली संयंत्रे, मशीनरी, यंत्रे इ. वस्तु देखभाल करण्याचे व्यवस्था करणे.
१२. संस्थेच्या कार्यालयासाठी, रूग्णालयासाठी साधने, यंत्रसामुग्री साठविण्यासाठी जागा संपादन करणे भाडयाने घेणे, खरेदी करणे, लीजवर घेणे, इतर मार्गाने संपादन करणे.

अध्यक्ष

१३. संस्थेची साधने व यंत्र सामुग्री साठविण्याची जागा व संस्थेची साधने व यंत्रसामुग्री याची आगीपासून नुकसान होऊ नये म्हणून योग्य ती उपाय योजना करणे.

१४.ज्या व्यवस्थापक व इतर सेवकांच्या रोकडीशी, साधने व यंत्रसामुग्रीशी महत्वाच्या कागदपत्रांशी अगर रोख्यांशी संबंध येत असेल अशांकडून योग्य त्या रक्कमेचा प्रमाणानूसार जामीनरोखा घेणे.

१५. अधिनियमातील कलम ८२ व नियम ७३ मधील तरतुदीनुसार लेखापरीक्षण दोषदुरुस्ती अहवाल ओ नमुन्यात अधिमंडळाचे वार्षिक बैठकीचे मंजुरीनंतर निबंधकाकडे पाठविणे.

१६. अंतर्गत लेखापरीक्षकांची नेमणूक करणे, वैधानिक लेखापरीक्षक नियुक्ती, अधिमंडळ बैठकीस शिफारस करणे व त्याचे संमतीसह वैधानिक लेखापरीक्षकाचे नाव संस्थेच्या निबंधकास कळविणे.

१७. सेवक वर्ग, मजुरांना द्यावयाच्या वेतनाची व मजूरीचे प्रमाण ठरविणे.

१८. दरवर्षी आर्थिक वर्ष समाप्तीनंतर ६ महिन्याच्या आत (३० सप्टेंबर पूर्वी) त्या आर्थिक वर्षांची खालील विविरणपत्रे तयार करणे व निबंधकाकडे दाखल करणे. विवरण पत्र दाखल करणेची अंतिम जबाबदारी संस्थेचे अध्यक्ष यांची राहील.

१. संस्थेच्या वर्षभरातील कामकाजाची माहिती देणारा वार्षिक अहवाल लेखापरीक्षीत आर्थिक पत्रके .

२. अहवाल वर्षाचा वैधानिक लेखापरीक्षण अहवाल

३. नफा वाटणी विनियोजन

४. उपविधी दुरुस्ती (असलेस)

५. अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीची तारीख व समितीची मुदत संपण्याची तारीख

६. अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीत नियुक्त केलेल्या वैधानिक लेखापरिक्षकाची माहिती व त्याचे संमतीपत्रक

७. कायद्यातील तरतुदीनुसार निबंधकास आवश्यक वाटल्यास इतर कोणतीही माहिती

१९. संस्था सदस्य व संचालक मंडळ सदस्य हे क्रियाशील कसे राहतील यासाठी जरूर ती व्यवस्था पुरवणे व त्यासाठी सकारात्मक प्रयत्न करणे.

२०. संस्था सदस्य व संचालक मंडळ सदस्य व कर्मचारी यांना कलम २४ क प्रमाणे सहकार प्रशिक्षण देणे.

२१. संस्थेच्या सुयोग्य संचालनासाठी नियमावल्या तयार करणे.

२२. रुग्णालयासाठी आवश्यक लागणाऱ्या परवानग्या व परवाने त्यांचे नुतणीकरण संबंधीत शासकीय/निमशासकीय विभाग व यंत्रणांकडून प्राप्त करून घेणे.

२३. खालील संघीय संस्थांचे सभासदत्व स्विकारणे.

अ) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक.

अध्यक्ष

...कारी रुग्णालय मर्या. पुणे

आ) महाराष्ट्र राज्य सहकारी संघ

इ) महाराष्ट्र राज्य सहकारी बँक

ई) इतर संघिय संस्था

२४. पुढील आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक तयार करणे

२५. पोटनियम दुरुस्ती अधिमंडळ बैठकीस शिफारस करणे.

२६. संस्थेच्या वतीने अथवा विरूध्द न्यायालीन प्रकरणात कायदेतज्ञाची नेमणूक करणे, दावा दाखल करणे, पदाधिका-यास किंवा अधिका-यास प्राधिकृत करणे, कायदेतज्ञाचे व्यवसायिक शुल्क ठरविणे.

२७. मेडिको लीगल एक्सपर्टची नेमणूक करणे. शुल्क ठरविणे.

## प्रकरण ६ :- उपसमित्या

**४२ :-**

संचालक मंडळाने पदभार घेतल्यानंतरच्या पहिल्या संचालक मंडळ सभेत रूग्णालयाच्या सुयोग्य व सुव्यवस्थित संचालनासाठी खालील प्रमाणे नमूद समित्यांचे गठण करेल. प्रत्येक उपसमिती सर्वसाधारण पणे ५ सदस्यांची असेल व गणपूर्ती तीन ची असेल. सदर उपसमित्यांचे पदसिध्द अध्यक्ष हे संस्थेचे अध्यक्ष राहतील किंवा संस्थेचे अध्यक्ष समित्यांचे अध्यक्ष ठरवतील, सदर उपसमित्यांचे इतिवृत्तास संचालक मंडळ सभेची मान्यता घेणे अनिवार्य राहील. या सर्व उपसमित्यांचे सदस्य सचिव वैदयकीय संचालक राहतील. सल्लागार समिती वगळता इतर उपसमितीतील सदस्य हे निवडून आलेल्या संचालकातून नेमले जातील.

१. रूग्णालय उपसमिती :-

- रुग्णालयाचे दैनंदिन कामकाज सुयोग्य व सुव्यवस्थित रित्या हाताळणे.
- रुग्णालयातील व प्रशासनातील अधिकारी व सेवक यांचे कामकाजावर दैनंदिन नियंत्रण ठेवणे, कामकाज वाटप करणे, विभागवार नियुक्ती करणे, तज्ञांशी व डॉक्टरांशी समन्वय साधून वेळेवर त्यांची उपस्थिती राहतील याची दक्षता घेणे आवश्यकतेप्रमाणे शिस्तभंगात्मक कारवाई प्रस्तावित करणे आणि सेवा नियम यातील अटी व शर्तीचे पालन करून घेणे.
- रूग्णालयात आकारण्यात येणारे शुल्क जसे की, कन्सलटेशन फी, पॅथॉलॉजि व रेडीओ, डायग्नोस्टिक सेवांचे शुल्क, तज्ञांचे शुल्क, शस्त्रक्रियांचे शुल्क, रूम चार्जेस, बेड चार्जेस, इत्यादी शुल्कांची आकारणी सुचविणे व मान्यता घेणे.
- मेडिकल रेकॉर्ड जतन करणे.
- सभासदांचा आरोग्य विमा कंपन्यांशी टाय अप करणे, रुग्णालयाचा विमा काढणे, आरोग्य सुविधा

अध्यक्ष

बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्या. पुणे

- रूग्णांना मिळणेसाठी विमा कंपन्यांशी करार करणे.
- रूग्णालयासाठी लागणा-या आवश्यक त्या वैधानिक परवानग्या, परवाने मिळविणे, वेळोवेळी परवाने नुतनीकरण करणे या बाबत कार्यान्वियन यंत्रणांशी समन्वय साधणे.
- संचालक मंडळ वेळोवेळी सुयोग्य व्यवस्थापनासाठी सुचविल ती कामे करणे.

**२. खरेदी समिती :-**

रूग्णालय दैनंदिन रित्या सुव्यवस्थित व सुरळीत चालविण्यासाठी लागणारी सर्व उपकरणे, यंत्र, संयंत्रे, औषधी, वाहने, संगणक, स्टेशनरी, शीतकरण यंत्र इत्यादी रूग्णालयासाठी लागणा-या साधन सामग्रीचा विहीत पध्दतीचा अवलंब करून खरेदी करणे, दान घेणे, संपादन करणे. संचालक मंडळ वेळोवेळी सुचविल ते कामे करणे.

**३. बांधकाम समिती :-**

महाविदयालय, रूग्णालये, रेडिओ डायग्नोस्टिक सेंटरर्स, पॅथॉलॉजी लॅब इत्यादी सुविधांसाठी जागा खरेदी करणे, भाडे तत्त्वावर घेणे, लीजवर घेणे, दान घेणे, इतर वैधानिक मार्गाने जागा संपादन करणे, बांधकाम साहित्य खरेदी करणे, बांधकाम करणे, विदयुतीकरण करणे, डागडुजी करणे, बांधकाम आराखडे तयार करणे, मेडिकल वेस्ट डिसपोजल ची व्यवस्था निर्माण करणी बांधकामासाठी लागणा-या स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय व नीमशासकीय विभागांच्या परवानग्या प्राप्त करणे, कंत्राटदार नेमणे, मॅन्टेन्स करणेसाठी कंत्राटदार नेमणे, पाणी, लाईट, सांडपाणी, जनरेटर इत्यादी आधुनिक व्यवस्था निर्माण करणे, फायर फायटींगची व्यवस्था निर्माण करणे व त्याचे ऑडिट करणे त्यासाठी शासकीय यंत्रणांची परवानगी घेणे, इत्यादी अनुषंगिक कामकाज व वेळोवेळी संचालक मंडळ सुपूर्द करेल ते कामकाज करणे. या समितीत बांधकाम विभागाचा सेवानिवृत्त एक तज्ञ अनिवार्य राहील. संचालक मंडळात असा तज्ञ नसल्यास सभासदांमधून अथवा बाहय स्त्रोताद्वारे एक सदस्य स्विकृत करणे अनिवार्य राहील.

**४. सल्लागार समिती :-**

सदर समिती रूग्णालयाचे सुयोग्य नियोजन करणेसाठी संचालक मंडळातील दोन डॉक्टर, सभासदांमधील एक डॉक्टर व एक बाहयस्त्रोताद्वारे तज्ञ डॉक्टर व्यक्तीचा समावेश करून गठीत करणे, सदर समिती रूग्णालय चालविण्यासाठी लागणा-या आवश्यक त्या सुविधा, वैधानिक परवानग्या, परवाने, अधिनियम, नियम, मार्गदर्शक सुचना, शासन व स्थानिक स्वराज्य संस्थांचे धोरण, सुचना, मार्गदर्शक तत्त्वे, नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करणे, संशोधन अवगत करणे, अदयावत उपकरणे इत्यादी बाबत संचालक मंडळास मार्गदर्शन करेल. रूग्णालयासाठी दिशादर्शन करेल. या समितीतील बाहय तज्ञ डॉक्टरांना मेहताना अनुज्ञेय राहील.

उपरोक्त् नमूद उपसमित्यांच्या आवश्यकतेनुसार वेळोवेळी सभा आयोजित कराव्यात.

अध्यक्ष

बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्या. पुणे

## प्रकरण ७ :- सभासद व देणगीदार यांना दयावयाच्या सवलती

४३ :-

**१. देणगीदारांचे प्रकार :-**

| | |
|---|---|
| चीफ पॅटर्न | :- रू १ लाख व त्यापेक्षा जास्त देणगी देणारा |
| पॅटर्न | :-रू ७५ हजार ते ९९.९९९ देणगी देणारा |
| डोणर १ | :-रु ५० हजार ते ७४.९९९ देणगी देणारा |
| डोणर २ | :-रु २५ हजार ते ४९,९९९ देणगी देणारा |

२. कन्सल्टींग फी व फार्मसी मध्ये शुल्क सवलत अनुज्ञेय राहणार नाही.

३. पॅथॉलॉजी लॅब रेडीओ डायग्नॉस्टिक सुविधा, शल्य चिकित्सा, खोली भाडे, वॉर्ड चार्जेस, इतर ऑपरेटीव्ह व नॉन ऑपरेटिव्ह प्रोसिजर्स या सुविधात शुल्क सवलत अनुज्ञेय राहील. तथापि, संचालक मंडळ सदस्यांना व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना अशी सवलत अनुज्ञेय नाही.

४. सवलत :-

| | |
|---|---|
| चीफ पॅटर्न | :-४०% सवलत |
| पॅटर्न | :-३५% सवलत |
| डोणर १ | :-३०% सवलत |
| डोणर २ | :-२५% सवलत |
| सभासद व त्यांचे कुटुंब सदस्य | :- २०% सवलत |

कुटुंबाची व्याख्या - महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे तरतूदीनुसार समजली जाईल.

## प्रकरण ८: नफा विभागणी.

४४ :-

निव्वळ नफ्याची विभागणी खालील प्रमाणे

| | |
|---|---|
| राखीव निधी | :- २५% |
| बांधकामनिधी | :- १५% |
| शिक्षण प्रशिक्षणनिधी | :- ५% |
| घसारा निधी (किंवा नियमाप्रमाणे) | :- १० % |
| मेडिकल रिलीफ फंड आणि दारिद्य रेषेखालील कुटुंब सुविधा सवलत निधी | :- २५% |
| भागभांडवल विमोचन निधी | :- १०% |
| लाभांश इतरसाठी | :- १०% |

अध्यक्ष

बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्या. पुणे

## प्रकरण ९ :- वैदयकीय संचालक .

४५ :-

**वैदयकीय संचालक यांची खालीलप्रमाणे कर्तव्य आणि जबाबदा-या असतील :**

संचालक मंडळ रूग्णालयाचे वैदयकीय संचालक यांची नियुक्ती करेल. सदर वैदयकीय संचालक हा वैदयकीय क्षेत्रातील एमडी.. एमएस, एमसीएच. डीएम, हॉस्पिटल ॲडमिनिस्ट्रेशन मध्ये पदव्युत्तर ,पदवीधारण करणारा असला पाहीजे. त्याची नेमणूक पूर्ण वेळ व पगारी असेल.

१. संचालक मंडळ उपसमिती अधिमंडळाच्या वार्षिक बैठकांचे आयोजन अध्यक्षांच्या सल्ल्याने करणे.

२. रूग्णालयासाठी लागणा-या आवश्यक त्या वैधानिक परवानग्या, परवाने व त्याचे नुतनीकरणे करणे.

३. रुग्णालयाचे दैनंदिन प्रशासकीय व तांत्रिक कामकाज चालविणे.

४. डॉक्टर, नर्सेस, पॅरामिडिकल स्टाफ, तांत्रिक सेवक, यांचे कामकाज वाटप करणे, कामकाज करून घेणे, त्यांचे कामकाजावर नियंत्रण ठेवणे

५. रूग्णालयातील सोयी सुविधा, यंत्रे, संयंत्रे, उपकरणे, वॉर्ड रूम्स, आंतररूग्ण विभाग, बाहय रूग्ण विभाग, ऑपरेशन थीयटर्स, पॅथॉलॉजी लॅब, रेडीओ डायग्नॉस्टिक सेंटर्स, औषधी व इतर साधन सामग्री व सर्व सुविधा सुव्यवस्थित कार्यान्वित ठेवणे.

६. मेडिकल रेकॉर्ड जतन करणे

७. रूग्णालयाचा व यंत्रसामुग्रीचा विमा काढणे, विमा नुतनीकरण करणे.

८. शासकीय निमशासकीय यंत्रणांशी समन्वय साधणे.

९. सभासद व इतर रूग्णांना आरोग्य विमा कंपन्यांशी टायअप करणे

१०. अग्नीक्षमन व्यवस्थेची व्यवस्था करणे व त्याचे लेखापरीक्षण करणे

११. संचालक मंडळ वेळोवेळी सुचविल ते कर्तव्य करणे.

## प्रकरण १० :- व्यवस्थापकाची कामे.

४६ :-

१. व्यवस्थापकाची नेमणूक संचालक मंडळ करेल.

२. कायदा व नियमातील तरतुदीप्रमाणे संस्थेच्या एखादया करारात किंवा व्यवहारात खरेदी केलेल्या

अध्यक्ष

बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्या. पुणे

अगर विकलेल्या मिळकतीत व्यवस्थापकास कसलाही भाग अगर हितसंबंध ठेवता येणार नाही.

३. व्यवस्थापकाची कामे पुढील प्रमाणे असतील

१. संस्थेच्या अधिमंडळाची बैठक व संचालक मंडळाच्या सभा, उपसमित्यांच्या सभा अध्यक्षांच्या पूर्वपरवानगीने बोलावण्यासाठी वैदयकीय संचालक यांना सहाय्य करणे.

२. अशा सभात होणा-या कामांची नोंद नोंदवहीत करणे. इतिवृत्त तयार करणे.

३. वैदयकीय संचालकांच्या नियंत्रणात कामकाज करणे.

४. कायदा व नियमातील नमूद केलेल्या व संस्थेने ठरविलेल्या सर्व नोंदवहया व हिशोब पुस्तके वेळच्या वेळी लिहून अद्ययावत ठेवणे.

५. जमा पावत्या, खर्चाच्या पावत्या (व्हाऊचर्स) संस्थेचे काम चालविण्यासाठी लागणारी सर्व कागदपत्रे तयार करणे.

६. कायदा व नियमाप्रमाणे आर्थिक पत्रके नफा तोटा पत्रक, तेरीज पत्रक ठरलेल्या मुदतीच्या आत तयार करणे. संचालक मंडळापुढे ठेवणे व साधारण सभेने नेमलेल्या लेखापरीक्षकांकडे पाठविण्याची व्यवस्था करणे.

७. संस्थेचे पत्रव्यवहार चालविणे व सदस्यांना लागणारी जरूर ती माहिती वेळोवेळी पुरविणे.

८. लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर ताबडतोब तो विचाराकरीता संचालक मंडळापुढे ठेवणे, व दाखविलेले दोष व चुका दुरूस्त करण्याबाबत जरूर ती तजवीज करणे व नियमाप्रमाणे दोषदुरूस्ती अहवाल तयार करणे व संचालक मंडळापुढे ठेवणे.

९. अधिनस्त सेवकांवर देखरेख ठेवणे व त्यांचे नियंत्रण करणे.

१०. सभासद, संचालक, मंडळ, सेवक यांचे प्रशिक्षणासाठी कॅलेंडर तयार करणे.

११. भविष्य निर्वाह निधी अधिनियम १९७१ प्रमाणे लेखे व नोंदवहया ठेवणे

## प्रकरण ११ :-सभासदांची जबाबदारी व कर्तव्ये.

### ४७.:- सभासदांची जबाबदारी व कर्तव्ये पुढील प्रमाणे

१. संस्थेने दिलेले ओळखपत्र प्रत्येक सभासदाने स्वत:जवळ ठेवणे आवश्यक आहे.

२. कलम २६ व उपविधीतील तरतूद क्रमांक ७ अ चे पालन करणे व क्रियाशील सभसद राहणे.

३. अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीस उपस्थित राहणे.

अध्यक्ष

बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्या. पुणे

४. प्रती वर्षी वार्षिक वर्गणी ३० सप्टेंबर पूर्वी अदा करणे.

५. संचालक मंडळ निवडणूकीस मतदान करणे, फक्त क्रियाशील सभासदांनाच निवडणूकीत व अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीस मतदान करण्याचा अधिकार राहील.

## प्रकरण १२ : अध्यक्ष व त्यांची कर्तव्ये

४८:-

१. संस्थेचे अध्यक्ष हे संस्थेचे कार्यकारी प्रमुख राहतील. / असतील.

२. अधिमंडळाची बैठक, संचालक मंडळ बैठक, उपसमित्यांची बैठक, बैठकांचे पदसिध्द अध्यक्ष असतील. उपसमित्यांचे अध्यक्ष हे संस्थेचे अध्यक्ष नेमणूक करू शकतील. या समित्यांचे ठरावांची अंमलबजावणी करून घेणे.

३. संस्थेच्या सर्व प्रकारच्या सभांच्या तारखा निश्चित करणे.

४. संस्थेच्या दैनंदिन व्यवहारावर देखरेख ठेवणे, नियंत्रण ठेवणे, मार्गदर्शन करणे.

५. अधिमंडळ बैठकीत किंवा संचालक मंडळ सभेत मतदानाची मागणी झाल्यास त्यावर निर्णय देणे.

६. सभेतील विषयावर चर्चाअंती निर्णय देणे.

७. संस्थेचे उदिष्ट पूर्तीसाठी कार्यप्रवण राहणे.

८. अध्यक्षांच्या अनुपस्थितीत उपाध्यक्षांना आवश्यकतेनुसार अधिकार प्रदान करणे.

९. अधिमंडळ बैठक, संचालक मंडळ सभा इतिवृत्त स्वाक्षरीत करणे.

१०. बँकेच्या व्यवहारासाठी अध्यक्षांची व निवडून आलेला संचालक किंवा वैदयकीय संचालक यांची स्वाक्षरी राहील.

११. शासन, स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याशी पत्रव्यवहार करणे.

## प्रकरण १३ : संकिर्ण

४९ :-

१. संस्थेचे रोखे, संस्थेच्या हिशोबची पुस्तके व कागदपत्रे व्यवस्थापकाच्या ताब्यात राहतील व ती सांभाळण्याची जबाबदारी व्यवस्थापकावर राहील.

२. नियमामध्ये नमूद केलेली व निबंधकांनी ठरविलेली व संचालक मंडळास आवश्यक वाटतील अशी हिशोबाची

अध्यक्ष

बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्या. पुणे

पुस्तके व कागदपत्रे संस्थेने ठेवली पाहीजेत. त्या पुस्तकावर कागदपत्रावर जरूर तेथे व किर्दीवर दररोजच्या व्यवहाराच्या शेवटी अध्यक्ष / वैदयकीय संचालक व व्यवस्थापकाने सहया केल्या पाहीजेत. अध्यक्ष / वैदयकीय संचालक ब व्यवस्थापक हे संस्थेच्या कागदपत्राच्या प्रमाणित नकलांवर सहया करतील या व्यतिरिक्त दुसरे अधिकारी कागदपत्रावर सहया करावयाच्या असल्यास त्यांना त्या करण्यासाठी संस्थेस अधिकार देता येईल.

३. संस्थेत आलेल्या ठेवीच्या देणगीच्या व इतर रकमांच्या ठराविक नमुन्यातील जमेच्या पावत्या व भाग दाखले/ वैदयकीय संचालक व व्यवस्थापक सहया करून दिल्या पाहिजेत.

४. संस्थेच्या कोणत्याही सभासदाला अधिनियम कलम ३२ मधील तरतूदीनुसार व त्यात नमूद केलेली संस्थेची पुस्तके पाहता येतील. अगर नियम २७ मधील तरतूदीनुसार त्याच्या नकला त्यास देता येतील. तसेच त्यांनी संस्थेशी केलेल्या व्यवहाराबाबत संस्थेच्या कार्यालयीन वेळेत संस्थेशी त्याचे झालेले व्यवहार पाहता येतील.

५. संस्थेचे उपविधी बदल करणे, एखादा उपविधी रद्द करणे किंवा नवीन उपविधी करावयाचा असल्यास कलम १३ व नियम १२ मधील तरतूदी अनुसरल्या जातील. त्याकरीता भरलेल्या अधिमंडळाच्या बैठकीस हजर असणा-या व मत देणा-या सभासदांचे निदान २/३ संख्येने त्या बदलासंबंधीचा ठराव पास केला पाहिजे. त्या बैठकीची नोटीस बैठकीच्या तारखेपूर्वी निदान १४ दिवस अगोदर सर्व सभासदांना दिली पाहीजे. कोणता उपविधी कसा बदलायचा, कोणता नवीन स्वीकारायचा अगर रद्द करावयाचा हे त्या नोटीसीत स्पष्टपणे नमूद केले पाहीजे. निबंधक यांच्याकडून दुरूस्तीस मान्यता व त्याची नोंद होईपर्यंत दुरुस्त केलेला उपविधी अमलात आणता येणार नाही.

६. सभासदास नोटीस दिली पाहीजे असे या उपविधीत जेथे नमूद केले असेल तेथे सभासदांच्या दिलेल्या पत्त्यावर अशी नोटीस दिली म्हणजे त्या नोटीसीची योग्य बजावणी झाली असे समजले जाईल.

७. संस्थेचा शिक्का अधिनियम कलम ३६ प्रमाणे संस्थेचा एक सामायिक शिक्का (सील) असेल व तो व्यवस्थापकाच्या ताब्यात राहील व त्याचा वापर संचालक मंडळाच्या ठरावाच्या अधिकारान्वये होईल.

८. शासन अर्थ सहाय्य मिळाल्यास शासन अटी व शर्तीनुसार स्वतंत्र सनियंत्रण समिती गठीत करणे अनिवार्य राहील.

अध्यक्ष

बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्या. पुणे

अध्यक्ष

बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्या. पुणे